# पसायदान

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।

तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥१॥

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।

भूतां परस्परे जडो। मैत्र जिवांचे ॥२॥

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो ।

जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥३॥

वर्षत सकळ मंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।

अनवरत भूमंडळी । भेटतु या भूतां ॥४॥

चलां कल्पतरूंचे अरव । चेतना चिंतामणीचे गाव ।

बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥५॥

चंद्रमे जे अलांच्छन । मार्तंड जे तापहिन ।

ते सर्वाहि सदा सज्जन । सोयरे हो तु ॥६॥

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकी ।

भजितो आदि पुरुषी । अखंडित ॥७॥

आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकीं इयें।

दृष्टादृष्ट विजये । होआवे जी ॥८॥

तेथ म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दान पसावो ।

येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया जाला ॥९॥

ओम शांतिः शांतिः शांतिः ही